जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

4 JAN 2017

लोकमत

# दिनदर्शिकेद्वारे विद्यापीठातील रानफुलांचे दर्शन

## नववर्षातील दैनंदिनीचे कुलगुरुंच्या हस्ते प्रकाशन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या परिसरात बहरलेल्या रानफुलांचे दर्शन आता वर्षभर दिनदर्शिकेच्या माध्यमातून घडणार आहे. विद्यापीठाने या रानफुलांच्या छायाचित्रांचा वापर सन २०१७ च्या दिनदर्शिकेसाठी केला आहे. ही दिनदर्शिका आणि दैनंदिनीचे प्रकाशन कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते मंगळवारी झाले.

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सभागृहातील कार्यक्रमात कुलगुरु डॉ. शिंदे म्हणाले, गेल्यावर्षीपासून विद्यापीठाने दिनदर्शिकेच्या प्रकाशनाला सुरुवात केली. यावर्षीच्या दिनदर्शिकेसाठी 'विद्यापीठ परिसरात बहरलेली रानफुले' असा विषय घेऊन काम करण्यात आले. बारा निवडक छायाचित्रांचा समावेश केला आहे.




शिवाजी विद्यापीठाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन मंगळवारी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी डावीकडून कायदे अधिकारी अनुष्का कदम, उपकुलसचिव विभा अंत्रेडी, डॉ. डी. टी. शिर्के, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, जनसंपर्क अधिकारी आलोक जत्राटकर, डॉ. ए. एम. गुरव उपस्थित होते.

यावेळी दिनदर्शिका निर्मितीत योगदान देणाऱ्या डॉ. विनोद शिंपले, मानसिंगराज निंबाळकर आणि मुद्रणालय अधीक्षक भूषण पाटील यांचा कुलगुरु डॉ. शिंदे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आल. कार्यक्रमास कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, बीसीयुडी संचालक डॉ. डी. आर. मोरे, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, दैनंदिनी समितीचे अध्यक्ष डॉ. डी. टी. शिर्के, ए. एम. गुरव, उपकुलसचिव विभा अंत्रेडी, नीलेश बनसोडे, एस. सी. घाटगे, कायदे अधिकारी अनुष्का कदम, सांख्यिकीय अधिकारी अभिजित रेडेकर, सहाय्यक कुलसचिव निवास माने आदी उपस्थित होते. (प्रतिनिधी)

### कुलगुरुंनी काढलेल्या छायाचित्रांचा समावेश

कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी काढलेली छायाचित्रे हे यंदाच्या विद्यापीठ दैनंदिनीचे वैशिष्ट्य आहे. दिनदर्शिकेमधील रानफुलांची छायाचित्रे जनसंपर्क अधिकारी आलोक जत्राटकर यांनी काढली आहेत. या रानफुलांची शास्त्रीय नावे डॉ. शिंपले आणि डॉ. निंबाळकर यांनी दिली आहेत.

4 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सकाळ

# 'बहरलेली रानफुले' विषयातून दिनदर्शिका

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे : १२ निवडक छायाचित्रांचा समावेश, दैनंदिनीही प्रसिद्ध

कोल्हापूर, ता. ३ : शिवाजी विद्यापीठाची २०१७ ची दैनंदिनी व दिनदर्शिकेचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते प्रकाशन झाले. व्यवस्थापन परिषद सभागृहात कार्यक्रम झाला.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, "यंदाच्या दिनदर्शिकेसाठी विद्यापीठ परिसरात 'बहरलेली रानफुले' असा विषय घेऊन काम करण्यात आले.

१२ निवडक छायाचित्रांचा त्यात समावेश केला असून हीच छायाचित्रे दैनंदिनीमध्येही समाविष्ट केली आहेत. अशा प्रकारे दोन्ही उपक्रम समान धाग्याने गुंफण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न आहे.''

जनसंपर्क अधिकारी आलोक जत्राटकर यांनी विषय निवडीपासून ते अंतिम निर्मिती क्षणापर्यंत कुलगुरू डॉ. शिंदे यांच्यासह बीसीयूडी संचालक डॉ. डी. आर. मोरे, डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. डी. के. गायकवाड यांनी वेळोवेळी मार्गदर्शन व सहकार्य केले; तसेच आस्थापना विभाग, मुद्रणालय, उद्यान विभागाचेही सहकार्य मिळाल्याचे सांगितले.

या वेळी बीसीयूडी संचालक डॉ. डी. आर. मोरे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, बीसीयूडीचे संचालक डॉ. डी. आर. मोरे, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, दैनंदिनी समितीचे अध्यक्ष डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. ए. एम. गुरव, उपकुलसचिव विभा अंत्रेडी, डॉ. नीलेश बनसोडे, एस. सी. घाटगे, कायदे अधिकारी अनुष्का कदम, सांख्यिकीय अधिकारी अभिजित रेडेकर, सहायक कुलसचिव निवास माने यांच्यासह प्रशासकीय सेवक उपस्थित होते. या वेळी दिनदर्शिकेच्या निर्मितीत महत्त्वाचे योगदान देणारे डॉ. विनोद शिंपले, डॉ. मानसिंगराज निंबाळकर आणि मुद्रणालय अधीक्षक भूषण पाटील यांचा विशेष गौरव करण्यात आला.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दैनंदिनीचे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, बीसीयूडीचे संचालक डॉ. डी. आर. मोरे, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी डॉ. अजित चौगुले, डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. ए. एम. गुरव, कायदा अधिकारी अनुष्का कदम, उपकुलसचिव विभा अंत्रेडी, जनसंपर्क अधिकारी आलोक जत्राटकर.**

### कुलगुरूंची छायाचित्रे वैशिष्ट्यपूर्ण

कुलगुरू डॉ. शिंदे यांनी काढलेली छायाचित्रे हे यंदाच्या विद्यापीठ दैनंदिनीचे वैशिष्ट्य आहे. दैनंदिनीच्या मुखपृष्ठावर विद्यापीठाच्या प्रांगणातील भव्य शिवपुतळ्याचे पावसाळ्यातील प्रतिबिंब आणि मलपृष्ठावर विद्यापीठातील निसर्गरम्य मार्गाचे छायाचित्र आहे. दिनदर्शिकेमधील व दैनंदिनीच्या आतील पानांवरील रानफुलांची छायाचित्रे जनसंपर्क अधिकारी जत्राटकर यांनी काढली आहेत. रानफुलांची शास्त्रीय नावे डॉ. विनोद शिंपले आणि डॉ. मानसिंगराज निंबाळकर यांनी दिली आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
4 JAN 2017

तरुण भारत

**थोडक्यात महत्त्वाचे**

## शिवाजी विद्यापीठाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या २०१७ची दैनंदिनी आणि दिनदर्शिकेचे प्रकाशन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. या दिनदर्शिकेसाठी 'विद्यापीठ परिसरात बहरलेली रानफुले'. असा विषय आहे. जनसंपर्क अधिकारी आलोक जत्राटकर यांनी माहिती दिली. यावेळी बीसीयुडी संचालक डॉ. डी. आर. मोरे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, बीसीयुडी संचालक डॉ. डी. आर. मोरे, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, दैनंदिनी समितीचे अध्यक्ष डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. ए. एम. गुरव, उपकुलसचिव विभा अंत्रेडी, डॉ. नीलेश बनसोडे, एस. सी. घाटगे, कायदे अधिकारी अनुष्का कदम, सांख्यिकीय अधिकारी अभिजीत रेडेकर, सहाय्यक कुलसचिव निवास माने उपस्थित होते. डॉ. विनोद शिंपले, डॉ. मानसिंगराज निंबाळकर आणि मुद्रणालय अधीक्षक भूषण पाटील यांचा गौरव करण्यात आला.

4 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत

# संशोधकांना नाविन्याचा ध्यास पाहिजे

## महेश काकडे यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठस्तरीय 'आविष्कार संशोधन प्रकल्प स्पर्धा' उत्साहात

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

सृजनशीलता, उपक्रमशीलता आणि नाविन्याचा ध्यास ही यशस्वी संशोधनाची त्रिसूत्री आहे. आयुष्याच्या प्रत्येक बाबतीत तिचा अवलंब केल्यास यश निश्चित मिळेल. त्यामुळे संशोधकाला कायम नाविन्याचा ध्यास असला पाहिजे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे परीक्षा नियंत्रक महेश काकडे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या लोककला केंद्रात 'आविष्कार-२०१६-१७' ही विद्यापीठस्तरीय संशोधन प्रकल्प स्पर्धा पार पडली. स्पर्धेचा पुरस्कार वितरण समारंभ राजर्षी शाहू सभागृहात झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी बीसीयुडी संचालक डॉ. डी. आर. मोरे होते. विद्यापीठस्तरीय स्पर्धेत २५० हून अधिक स्पर्धक सहभागी झाले होते.

काकडे म्हणाले, आविष्कार स्पर्धेची सन २००६ मध्ये सुरवात झाली, तेव्हा केवळ स्पर्धकांची संख्या ३५-३६ इतकी अल्प असायची. सध्या एक हजारांहून अधिक स्पर्धक सहभागी झाले आहेत. नवनव्या कल्पना, संकल्पना सादर करीत आहेत, ही अत्यंत उत्साहवर्धक बाब आहे. त्यांचा समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी उपयोग होणे आवश्यक आहे.

अध्यक्षीय भाषणात बीसीयुडी संचालक डॉ. मोरे म्हणाले, पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांमधील संशोधनवृत्तीला चालना देणे हा आविष्कार स्पर्धेच्या आयोजनामागील मुख्य उद्देश आहे. स्पर्धेला मिळणारा वाढता प्रतिसाद पाहता हा हेतू साध्य करण्याच्या दिशेने योग्य वाटचाल सुरू असल्याचा विश्वास मिळतो. पण, त्याचवेळी संशोधन प्रकल्पांची संख्या आणि त्यांचा दर्जा यांमधील असंतुलन, दरी कमी करण्याची गरज असल्याचेही त्यांनी सांगितले.

आविष्कारचे समन्वयक डॉ. ए.एम. गुरव यांनी प्रास्ताविक, विशाल ओव्हाळ यांनी सूत्रसंचालन केले. मोनाली खाचणे यांनी आभार मानले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील 'आविष्कार-२०१६-१७' च्या स्पर्धेमध्ये संशोधन प्रकल्पाची माहिती घेताना विद्यार्थी.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
4 JAN 2017
महाराष्ट्र टाईम्स

# 'काळाचे पडदे बाजूला ठेवून महिलांनी कार्यरत व्हावे'

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर



डॉ. तारा भवाळकर

'प्रश्न केवळ पुरूषांचे किंवा महिलांचे नसतात तर ते समाजाचे असतात. त्यामुळे स्त्री सबलीकरणासाठी फुले दाम्पत्याने उभारलेली चळवळ समाजाला दिशा देणारी ठरली. आज स्त्री शिकली असली तरी तिला संघर्ष करावा लागतो. त्यासाठी काळाचे पडदे बाजूला करून तिने कार्यरत रहावे,' असे आवाहन डॉ. तारा भवाळकर यांनी केले. शिवाजी विद्यापीठ सेवक संघाच्यावतीने सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ.विलास नांदवडेकर होते.

यावेळी डॉ. भवाळकर यांनी स्त्रीवर होणाऱ्या अन्यायांची विविध उदाहरणे विशद केली. आजही धार्मिक कार्यात स्त्रीला मान दिला जात नाही याविषयी त्यांनी खेद व्यक्त केला. त्यामुळे काळानुरूप स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला पाहिजे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

सुरेखा आडके यांनी डॉ. भवाळकर यांचा परिचय करून दिला. अध्यक्षीय भाषणात डॉ. नांदवडेकर यांनी परिस्थितीवर मात करून यश मिळवणाऱ्या महिलांचे अभिनंदन केले. रत्नमाला साळुंखे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- 4 JAN 2017

लोकमत

# 'एनएसएस'च्या स्वयंसेवकांनी 'कॅशलेस'चे प्रबोधन करावे

## विलास नांदवडेकर : वरणगे पाडळीमध्ये शिबिर

कोल्हापूर : राष्ट्रीय सेवा योजनेच्या (एनएसएस) स्वयंसेवकांनी कॅशलेस व्यवहार करण्याबाबत ग्रामीण भागात प्रबोधन करावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी मंगळवारी केले.

वरणगे पाडळी (ता. करवीर) येथे विद्यापीठ आणि महावीर महाविद्यालयातर्फे आयोजित 'एनएसएस'च्या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य आर. पी. लोखंडे होते. प्राचार्य लोखंडे म्हणाले, 'एनएसएस'च्या माध्यमातून वरणगे पाडळीतील तळ्याचा प्रश्न सोडविण्यात येणार आहे. कार्यक्रमात सरपंच संभाजी कांबळे, माजी सभापती पी. डी. पाटील, विद्यापीठाच्या 'एनएसएस'चे समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड यांनी मार्गदर्शन केले. यावेळी उपसरपंच लाडूबाई पाटील, अंकुश बनसोडे, वीरकुमार उपाध्ये, अश्विनी कोटणीस, कांचन कांबळे, आदींसह बी.ए.बी.एड्., बी.कॉम., बी.ए. आणि बी. एम. रोटे ज्युनिअर कॉलेजचे विद्यार्थी, एनएसएसचे स्वयंसेवक उपस्थित होते. प्रा. गोपाळ गावडे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. महादेव शिंदे यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. राहुल गवस व स्नेहल पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. अंकुश गोंडगे यांनी आभार मानले. (प्रतिनिधी)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
4 JAN 2017
सकाळ

अवतीभवती

# शिवाजी विद्यापीठात पीएलसी कार्यशाळेस प्रारंभ

कोल्हापूर, ता. ३ : "अभ्यासक्रमापलीकडे जाऊन तांत्रिक ज्ञान संपादन करण्यातच कौशल्यसिद्धता आहे आणि अशा तज्ज्ञ अभियंत्यांची देशाला गरज आहे, असे उद्गार शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक जयदीप बागी यांनी काढले. अधिविभागात पीएलसी प्रोग्रॅमिंग कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. विभागाचा इंडो-जर्मन टुलरूम औरंगाबाद इन्स्टिट्यूटशी करार असून त्या अंतर्गत येथे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना तेथील तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. समन्वयक प्रा. एस.बी. चव्हाण यांनी प्रास्ताविक केले. टुलरूमचे अभियंता संतोपदास यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाला ए. ए. शिरोळकर, यू. ए. पाटील, ए. ए. डुम, जी. एस. पाटील, पी. व्ही. सावंत यांच्यासह प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.